# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4
Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## National Service Scheme

**Dr.I.S. Mohurley**
**Programme Coordinator**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/NSS/151/2015** **Dt: 19 /11/2015**

प्रति,

मा. प्राचार्य
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
संलग्नित सर्व रासेयो महाविद्यालये.

**विषय:- उत्कर्ष–(२०१५–१६) सामाजिक सांस्कृतिक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरिता चमू निवडसाठी विद्यार्थ्यांचे नामनिर्देशन करण्याबाबत.**

संदर्भ:- पत्र. क्र. रासेयो–२०१४/(१०३/१४)/साशि–७ उवतंशिवि, मंत्रालय कक्ष महाराष्ट्र शासन मुंबई, दि. ०६ नोव्हेंबर, २०१५.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये आपणास कळविण्यात येत आहे की, उत्कर्ष– (२०१५–१६) सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा दि. १५ ते १७ जानेवारी, २०१६ दरम्यान **महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी** येथे आयोजित करण्यात येत आहे. सदर स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांची माहीती (नाव, महा. नाव, वय, मो. क्र., इमेल इ.) तसेच विद्यार्थी कोणत्या कलाप्रकारात सहभाग घेणार आहे याची संपूर्ण माहीती भरुन विद्यापीठाच्या रासेयो कक्षाकडे सादर करावी. स्पर्धेत सहभाग घेण्याकरिता विद्यापीठ चमूत एकूण १९ जणांचा सहभाग असेल. त्यामध्ये ०९ स्वयंसेवक, ०९ स्वयंसेविका ०१ कार्यक्रम अधिकारी यांची निवड विद्यापीठाच्या चमूमध्ये करण्यात येईल.

कृपया आपल्या महाविद्यालयातील स्वयंसेवक व स्वयंसेविकांची नावे संपूर्ण माहीतीसह दि. ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत रासेयो कक्षाकडे सादर करावी जेणेकरुन पुढील कार्यवाही करण्यासाठी सोयीचे होईल.

डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले
कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# स्पर्धेची नियम व नियमावली

**सर्वसाधारण नियम:**

१. सहभागी विद्यार्थ्यास राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे माहीत असावीत.

२. प्रत्येक स्वयंसेवक राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक राहील व त्याचे वय स्पर्धेदरम्यान २५ वर्षे पूर्ण नसावे.

३. विद्यार्थी आरोग्यदृष्ट्या सक्षम असेल याची खात्री करावी व सोबत डॉक्टरांनी प्रमाणित कलेले प्रमाणपत्र असावे.

४. विद्यार्थ्यास पालक तसेच प्राचार्यांच्या सही शिक्क्यासह सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे संमतीपत्र जोडणे बंधनकारक राहील.

५. स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश मूल्य आकारले जाणार नाही.

६. सहभागी विद्यार्थ्यांचा प्रवासखर्च महाविद्यालयाच्या प्रशासकीय खर्चातून करण्यात यावा.

७. प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत ठेवावे.

८. राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सव सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी उत्कर्ष या स्पर्धेत सहभागी होऊ नये.

९. ही स्पर्धा फक्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसाठी असेल.

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

.................

## उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा सहा विभागात घेतली जाईल.

### १) नृत्य :

**संकल्पना नृत्य :**

१. यामध्ये एका कलाकाराचा सहभाग असेल व कलाकृती सादर करताना ३ साथीदार सोबत असतील.

२. सहभागी कलाकार नृत्यातून आविष्कार सादर करेल. इतर साथीदार संगीत, संवाद व गाणे या माध्यमातून त्याला साथ देतील.

३. नृत्याचा कालावधी जास्तीत जास्त ७ मिनिटे असेल व ५ मिनिटानंतर सूचक घंटा वाजविली जाईल. (सादरीकरणाचा किमान वेळ ५ मिनिटे राहील.)

४. संकल्पना नृत्याच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या संकल्पनेवर आधारित विषयाचा संदेश प्राप्त होणे अपेक्षित आहे.

### २) नाट्य:

**पथनाट्य :**

१. नाट्यप्रकारात पथनाट्य सादर केले जाईल.

२. पथनाट्यामध्ये ४ ते ९ स्पर्धक भाग घेतील व त्यात साथीदार समाविष्ट असतील.

३. पथनाट्याचा कालावधी १० मिनिटे असेल व ८ मिनिटांनंतर सूचक घंटा वाजविण्यात येईल.

४. पथनाट्यामध्ये संहिता स्वयंसेवकांनी लिहिलेली असल्यास त्यास विशेष प्राधान्य दिले जाईल.

५. पथनाट्यामध्ये लेखी संहिता, संगीत, संवाद, दिग्दर्शकाचे नावे स्पर्धेपूर्वी आयोजक विद्यापीठास सादर करणे बंधनकारक राहतील.

६. या प्रकारात ध्वनीक्षेपकांचा वापर अपेक्षित नाही.

### ३. संगीत :

**अ) समूहगीत**

१. संगीत विभागात समूहगीत सादर केले जाईल.

२. या स्पर्धेत ६ कलाकार सहभाग घेतील व ३ साथीदार साथ देतील.

३. समूहगीत सादरीकरणाचा कालावधी १० मिनिटे असेल व त्यात सलग २ गीते सादर करणे अपेक्षित आहे.

४. त्यात १ लोकगीत व दुसरे देशभक्तीपर गीत असेल.

५. चित्रपटात सादर झालेले गीत स्पर्धेकरिता निवडू नये.

६. समूहगीत मराठी किंवा हिंदी भाषेत सादर करावे.

## ब) भारतीय लोकवाद्य वादन :

१. स्पर्धेत एका विद्यापीठाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.

२. रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे, इ. पूर्व तयारीसाठी २ मिनिटे दिली जातील.

३. संगीत साथीदारांची संख्या जास्तीत जास्त २ असावी.

४. सिनेगीतांना या कला प्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.

५. सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.

६. सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिली जातील व ८ मिनिटानंतर सूचक घंटा होईल.

## क) भारतीय लोककला ( पोवाडा, भारुड, भजन इ. ) :

१. सदर स्पर्धा प्रकारात महाराष्ट्रातील लोककला परंपरेच्या माध्यमातून विविध विषयांवर समाज जागृती करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध लोककला सादर करणे अपेक्षित आहे. उदा. पोवाडा, भारुड, भजन, ओव्या इत्यादी.

२. सदर स्पर्धेत १ स्पर्धक (मुलगा / मुलगी) भाग घेतील.

३. स्पर्धेचा कालावधी ५ मिनिटांचा असेल.

४. सदर स्पर्धेसाठी स्पर्धकास दोन साथीदार / सहाय्यकांचा वापर करता येईल.

## ४. ललितकला :

**भित्तीचित्र घोषवाक्यसह**

१. सदर स्पर्धेत २ स्पर्धक (१ मुलगा व १ मुलगी) सहभाग घेतील. म्हणजेच प्रत्येक विद्यापीठाच्या २ प्रवेशिका असतील.

२. स्पर्धेचा कालावधी अडीच तास असेल.

३. स्पर्धेस लागणारा कागद आयोजक विद्यापीठ उपलब्ध करेल. परंतु इतर साहित्य (उदा. रंग, ब्रश इ.) स्पर्धक व संबंधित विद्यापीठाने आणावयाचे आहे.

४. स्पर्धेचा विषय स्पर्धा सुरु करताना दिला जाईल.

५. भित्तीचित्राच्या मागील बाजूस स्पर्धकाचे नांव, विषय व विद्यापीठाचा कोड क्रमांक नमूद करावा.

६. भित्तीचित्रात समर्पक घोषवाक्याचा समावेश असावा.

## ५. साहित्य :

### अ) निबंध

१. निबंध स्पर्धेत दोन स्पर्धक (१ मुलगा व १ मुलगी) सहभागी होणे बंधनकारक राहील.

२. स्पर्धेचा कालावधी २ तास असेल.

३. निबंधाचे २ विषय संघप्रमुखाच्या बैठकीत पहिल्या दिवशी दिले जातील.

४. प्रत्येक संघाने २ स्पर्धकांची तयारी करून एकेकाने एका विषयावर स्पर्धेच्या दिवशी व नियोजित वेळी निबंध लिहावयाचा आहे.

५. निबंधाचे माध्यम मराठी, इंग्रजी व हिंदी असेल.

## ब) वक्तृत्व स्पर्धा :

१. वक्तृत्व स्पर्धेत १ स्पर्धक (मुलगा किंवा मुलगी) सहभागी होणे बंधनकारक राहील.

२. सहभागी स्पर्धकास सादरीकरणासाठी ५ मिनिटांचा कालावधी असेल व ३ मिनिटानंतर सूचकघंटा होईल.

३. स्पर्धेचे विषय संघ प्रमुखाच्या बैठकीत पहिल्या दिवशी जाहीर केला जाईल.

४. स्पर्धेदरम्यान जाहीर केलेल्या विषयावरील ठळक मुद्दे लेखी स्वरुपात परिक्षकांना सादर करणे बंधनकारक राहील.

## क) कविता

१. सदर स्पर्धेत २ स्पर्धक (एक मुलगा / एक मुलगी) सहभागी होणे बंधनकारक राहील.

२. कवितेचे माध्यम मराठी किंवा हिंदी असावे.

३. प्रत्येक स्पर्धकास ५ मिनिटे वेळ दिला जाईल.

४. स्पर्धेच्या आधी एक तास स्पर्धेच्या ठिकाणी कवितेचे विषय घोषित करण्यात येतील.

५. कवितेमधील नाविन्यता, आशय संदेश इत्यादी माध्यमातून कवितेला गुण दिले जातील.

## ६. छायाचित्रण स्पर्धा :

१. प्रत्येक सहभागी संघाने स्पर्धेच्या उदघाटनापासून ते स्पर्धा संपेपर्यंतच्या कालावधीतील छायाचित्रे काढावीत.

२. त्यातून उत्कृष्ट १५ छायाचित्रे लघुमुद्रिका (सी.डी.) स्वरुपात सादर करावयाची आहे.

३. स्पर्धेसाठी लागणारा डिजीटल कॅमेरा सहभागी विद्यापीठाने आणावयाचा आहे.

४. संगणक व संबंधित सामुग्रीची व्यवस्था आयोजक विद्यापीठ करेल.

## ७. पथ संचलन :

पथसंचलन हे स्पर्धेच्या उद्‌घाटन सोहळयाच्या आधी होणे अपेक्षित आहे. उत्कर्ष ह्या सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा असल्याने सामाजिक समस्यांवर आधारित रा. से. योजना उपक्रमांवर संबंधित संकल्पना त्यांना देण्यात येईल. दिलेल्या विषयांवर विविध प्रकारे वेशभूषा, रंगसंगती, चलचित्र, घोषवाक्ये, इत्यादींच्या माध्यमांचा पथसंचलनात वापर व्हावा. या पथसंचलनास सुरूवातीला विद्यापीठाचा बॅनर असावा. त्या पाठोपाठ पथ संचलनाचा चमू असावा. विद्यापीठ अंतर्गत सहभागी सर्व स्पर्धक पथ संचालनात भाग घेणे अपेक्षित आहे. परंतु पथ संचलनाच्या गुणांचा सर्वसाधारण विजेतेपद घोषित करताना विचार केला जाणार नाही.

नाविन्यपूर्ण, उत्कृष्ठ पथ संचलन चमूस फिरता चषक देण्यात येईल.

## उत्कर्ष - रासेयो कार्य भित्तिचित्र स्पर्धा

१) या स्पर्धेत प्रत्येक सहभागी विद्यापीठांनी रासेयो कार्य भित्तचित्र तयार करून आणावे.

२) हे भित्तिचित्र (१ मीटर X १ मीटर) या आकाराचे फ्लेक्स (Flex) मध्ये असावे.

३) या भित्तिचित्रात विद्यापीठांनी / महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या रासेयो उपक्रमांचे तपशील असावेत.

४) यामध्ये कार्यछायाचित्रे (मथळ्यासहित) / वृत्तपत्रे कात्रणे व इतर मुख्य रासेयोचा कार्य तपशील असावा.

५) प्रत्येक विद्यापीठांनी जास्तीत जास्त २ भित्तिचित्रे आणावीत.

६) 'उत्कर्ष' स्पर्धे दरम्यान ही भित्तचित्रे दर्शनी भागात प्रदर्शित केली जातील.

७) राज्य संपर्क अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या निवड समिती यांचे परीक्षण करतील.

८) उत्कृष्ठ तीन भित्तिचित्रास सन्मानित केले जाईल.

**GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI**
(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4
Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )
**National Service Scheme**

**Dr.I.S. Mohurley**
**Programme Coordinator**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com

## FORM OF INDEMNITY

In consideration of my being nominated/selected to undergo all types of training and also participating in any festival/course/adventure/cultural activities in/outside student welfare and travelling, I undertake and agree that neither I nor my executer/administrator will make any claim against the Government of Maharashtra or against any officer of Student Welfare/Principal/Cultural incharge/team managers in respect of any loss or injury to the property or person (including injury resulting in death), which may suffer while or inconsequence of my being in training/participating in any festival/course/adventure/cultural activities in/outside Student Welfare and travelling and I understand that no compensation will be paid by Government of Maharashtra or any officer as mentioned against any such loss or injury (including injury resulting in death), and I agree so as to bind myself, executers and administrators to indemnity to the Government of Maharashtra, any Student Welfare official and any person in the service of Government of Maharashtra, against any claim which may be made any third party against them or any of them arising out of any act or default on my part during or in connection of the said programmes and journey by Road/Rail/Sea/river/flight.

Signature of the applicant

Signed by the applicant with address

In presence of

1) Team Manager (Gents) ______________________________

2) Team Manager (Lady) ______________________________

Signature of Guardian

Signature of Principal

Signature of Prog. Coordinator